# लाचार विचारवंत

(पान ४ वरून)

असतो. त्यामुळे ते सरकारी प्रचारक होतात. सरकारची भाटगिरी करणाऱ्यांना राज्यपाल व राजदूत नेमतात. दरबारी विचारवंतांची सरकारी संस्था, कमिट्या व कमिशने यावर वर्णी लावली जाते आणि त्यांच्या मलिद्याचा प्रश्न परभारे सोडविला जातो.

व्यापारी विचारवंतांच्या नशिबाची सांगड व्यापारी संस्थांच्या नशिबाशी घातलेली असते. बुडत्या बोटीला सोडून उंदीर जसे पळून जातात तसेच हे व्यापारी विचारवंत सदैव सधन व्यापाऱ्यांच्या शोधात असतात. व्यापारी विचारवंत 'मानवी हक्कांचे' कट्टर पुरस्कर्ते म्हणून मिरवतात. त्यांचे 'मानवी हक्कावरील' प्रेम किती बेगडी आहे हे 'भोपाळ दुर्घटनेने' सप्रमाण दाखविले आहे. पाच वर्षे उलटली तरी सुध्दा मेलेल्या माणसांच्या कुटुंबियांना व जिवंतपणी मरण यातना भोगत पडलेल्या हजारो अजाण पुरुष स्त्रिया आणि मुलांना अजून नुकसान भरपाई मिळाली नाही. पण ज्या व्यापारी विचारवंतांनी Union carbide company च्या आणि भारत सरकारच्या वतीने भारतात आणि अमेरिकेत कोर्ट कचेरी केली त्यांनी कोट्यवधी रुपयांची कमाई या पाच वर्षात केली. जनतेवर कोसळणाऱ्या दैवी आणि मानवी आपत्ती ह्या व्यापारी विचारवंतांना सुवर्णसंधी असतात. 'मानवी हक्काच्या' नावाखाली व्यापारी विचारवंत आपले उखळ पांढरे करून घेतात. परावलंबी विचारवंत परकीय यन्त्यांच्या आश्रयावर जगतात. त्यामुळे ते परधार्जिणे असतात. आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताची भूमिका अलिप्ततेची आहे त्यामुळे भारतात परावलंबी विचारवंतांची मोठी चलती आहे. भारताप्रमाणे हे भारतीय परावलंबी विचारवंत कोणत्याही प्रकारच्या अटी नसलेल्या मदतीचा आग्रह धरीत नाहीत फक्त अटी आणि अटींचे धागेदोरे लोकांना कळू नयेत एवढाच त्यांचा आग्रह असतो. सध्या भारतात परावलंबी विचारवंतांचा तनखा धार्मिक आणि सांस्कृतिक संस्था, मिशनरी संस्था, तथाकथित संशोधन केंद्रे, विद्यापीठे, आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय फौंडिशर्नस मार्फत दिला जात आहे.

आश्रयावर जगणारे विचारवंत पवनकोंबडे (weather cocks) असतात. आजचा विचारवंत नगण्य आहे याचे कारण त्यांच्या बुध्दीचा अभाव आहे असे नाही तर त्यांच्यात शील आणि चारित्र्याचा अभाव हे आहे. विचारवंताकडून खऱ्या विचारांची अपेक्षा असेल तर समाजाने त्यांना आर्थिक स्वातंत्र्य दिले पाहिजे. गुरुदेव द्रोणाचार्यांचे 'अर्थस्य पुरुषोः दासः' हे विचारवंतांच्या लाचारीवर मार्मिक भाष्य आहे. -विचारवंत त्याच्या आश्रयदात्याचा प्रतिध्वनी असावा काय? आश्रितपणाच्या लाचारीतून त्याची सुटका कशी करावी? राज्यकर्ते, सत्ताधारी आणि धनिकांची हांजी हांजी विचारवंतांनी केलीच पाहिजे काय? विचारवंताविषयी हे प्रश्न जगातल्या सर्व देशांना भेडसावत आहेत भारताला हे प्रश्न अधिक तीव्रतेने भेडसावतात.